## प्रकरण क्र. आयडिए ०५/२०२१ नि. सी—२२ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा गैरअर्जदार यांच्या तर्फे भारतीय पुरावा कायदा कलम ६५—ब अन्वये प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी सादर केलेला आहे.

२. अर्जाचे व त्यावर अर्जदारातर्फे दाखल करण्यात आलेले लेखी म्हणने याचे तसेच संचीकेचे अवलोकन केले.

३. गैरअर्जदारा तर्फे ´विधीज्ञ तसेच अर्जदारातर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. गैरअर्जदार यांचे थोडक्यात असे कथन आहे की प्रस्तुत प्रकरण त्यांचे पुराव्यासाठी नेमण्यात आलेले आहे व त्यांना पुराव्याच्या अनुशंगाने ६५—ब प्रमाणपत्र दाखल करावयाचे असल्याने तशी परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

५. अर्जदारातर्फे विधीज्ञ यांनी अर्जाला जोरदार हरकत घेतलेली आहे. प्रस्तुत अर्ज हा विलंब करण्याच्या हेतुने सादर केलेला आहे. गैरअर्जदार सादर करत असलेले प्रमाणपत्र याचा प्रस्तुत प्रकरणाशी काहीही संबंध नाही व सदर दस्त हा प्रकरणाशी संबंधित नसल्याकारणाने अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जदारातर्फे करण्यात आली.

६. मुळ प्रकरण विचारात घेता अर्जदाराने सुट्टीच्या कालावधीत केलेल्या कामाच्या मोबदल्याची मागणी प्रस्तुत अर्जात केलेली आहे. अर्जदाराचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की गैरअर्जदार सादर करत असलेले प्रमाणपत्र तसेच त्यांनी दाखल केलेले अर्जदारा यांच्या

बॅकेचा खाते उतारा हे प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित व समर्पक असे दस्त नाही. दुस—या बाजुला गैरअर्जदार यांचे अधिवक्ता सदर प्रमाणपत्र तसेच अर्जदाराचा बॅक खातेउतारा केस शी संबंधित व समर्पक असल्याचा युक्तीवाद केला. अर्जदाराने केलेला क्मेल तसेच गैरअर्जदार यांनी दिलेले लेखी उत्तर विचारात घेता गैरअर्जदार सादर करत असलेले दस्त हा केस शी समर्पक असल्याचे दिसते. नि. १८ वरील आदेशाप्रमाणे माझे पुराधिकारी यांनी कागदपत्रे सादर करण्याची परवानगी गैरअर्जदार यांना दिलेली आहे. त्याअनुशंगाने कागदपत्र सादर करण्याची परवागनी गैरअर्जदार यांना देण्यात आलेली आहे. गैरअर्जदार यांनी परवानगी घेवून बॅकेचा खातेउतारा सादर केलेला आहे व त्याअनुशंगाने भारतीय पुरावा कायदा कलम ६५—ब चे प्रमाणपत्र सादर करण्याची परवागनी आज रोजी मागीतलेली आहे. गैरअर्जदार यांना न्याहितार्थ पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. तसेच दाखल करत असलेला दस्त हा प्रकरणाशी संबंधित असल्याने कागदपत्र दाखल करण्याची परवानगी नाकारता येण्यासारखी नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०८.०९.२०२५.